
ISSN-2320-4494
RNI NO. MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.8752

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Reviewed Refereed Research Journal

## SPECIAL ISSUE MARCH 2025

### From Tradition to Transformations : Women's Role in Shaping Society



- ARTS
- COMMERCE
- SCIENCE
- AGRICULTURE
- EDUCTION
- MANAGEMENT
- MEDICAL
- ENINEERING & IT
- LAW PHARMACY
- PHY. EDUCATION
- SOCIAL SCIENCE
- JOURNALISM
- MUSIC
- LIBRARY SCIENCE

**CHIEF EDITOR :**
Principal Dr. Sadashiv H. Sarkate
Arts. Science and Commerce College,
Sambhajinagar Gadhi - 431143

**EDITOR BY :**
Dr. Shanta Jadhavar
Sham Gadale Arts and
Science College, Dahiphal, Wadmauli,
Tq. Kaij, Dist. Beed (MS), India

Scanned with OKEN Scanner

ISSN- 2320-4494 | Impact Factor: 2.8752
RNI No. MAHAUL03008/13/2012-TC

POWER OF KNOWLEDGE
An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal
Special Issue March 2025

# From Tradition to Transformations: Women's Role in Shaping Society

**CHIEF EDITOR**

Prof. Dr. Sadashiv H. Sarkate

**EDITOR**

Dr. Shanta Jadhavar
Sham Gadale Arts & Science College
Dahiphal Wadmauli Ta.Kaij Dist. Beed

• Mailing address •
Prof. Dr. Sadashiv H. Sarkate
Chief editor: Power of Knowledge
Head of department, Marathi
Arts, sci.& com. college, Shivaji Nagar gadhi Ta. Georai Dist. Beed 431143 (MS)
Cell No. 9420029115/ 7875827115
Email: powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

Scanned with OKEN Scanner

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Power of Knowledge Peer Review Journal |Vol. II | March. 2025 | Impact Factor:2.8752

RNI No. MAHAUL03008/13/2012-TC ISSN-2320-4494

Special Issue Vol. II
March 2025

**Editorial Officer**
**Kranti Publication**
GeoraiDist.Beed Beed -431 127
Contact : 7875827115 **E-mail** :Sarkatelata@gmail.com

**Published By**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Advisory**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex. Vice Chancellor M.G.M.U. Sambhajinagar &Ex.Vice Chancellor Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication &JornalismDr. BAMU Sambhajinagar

**Hon. Dr. Pratibha Aher**
Ex-Management Council Member Dr. BAMU Sambhajinagar

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member Dr. BAMU Sambhajinagar

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD Dr. BAMU Sambhajinagar

**Hon. Principal Gautam Patil**
Management Council Member, Dr. BAMU Sambhajinagar

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member Dean, Faculty of Science, Dr. B.A.M.U. Sambhajinagar

**CHIEF EDITOR**

**Prof. Dr.Sadashiv Haribhau Sarkate**
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr. B.A.M.U. Sambhajinagar, Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed

**EDITOR BOARD**

**Dr.Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology Faculty of Fisheries & Marine Sci. Bogor Agricultural University, Indonsia

**Dr.Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts Dr.B.A.M.U.Sambhajinagar

**Vijay Pande**
Shri Sant Savta Mali Mahavidyalay, Phulambri Dist. Sambhajinagar

**Dr.Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi Dr.B.A.M.U.Sambhajinagar

**Dr.D.P. Takle**
Professor & Head Dept. of Economics L.B.S.College, ParturDist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,CollageShirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology, Dr.B.A.M.U. Sambhajinagar

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration, Kalikadevi College, Shirur (K.), Dist.Beed

**Dr.Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr.Rajesh Karpe**
Ex. Management Council Member Dr.B.A.M.U.Sambhajinagar

**Dr.Taher H. Pathan**
Aligad Muslim University, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce L.B.S.College, PartnrDist Jalna

**Dr.S.R.Takle**
Principal, Sant Savta Mali College, Phulambri Dist. Sambhajinagar

**Dr.Bharat Khandare**
MC Member &Principal, Swami Vivekanand College, Mantha. Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.FulchandSalampure**
Retired Professor

**Dr.Madhukar Jadhav**
Shri. Vyankatesh mahavidyalya, Deulgaonraja, Buldana

**PEER REVIEW / REFEREES**

**Dr. Shahaji Gaikwad**Ex-Chairman, BOS in English Dr. B.A.M.U. Sambhajinagar

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College, Pachod, Dist. Sambhajinagar

**Dr. Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College, Pachod, Dist. Sambhajinagar

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology Deogiri College, Sambhajinagar

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor JES College, Jalna

**MANAGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit. Prof.MohanKalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ३२. | मातृ मंदिरच्या संस्थापिका इंदिराबाई हळबे मावशी<br>डॉ.अशोक ज्ञानदेव पाटील | १५६-१६० |
| ३३. | स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतीकारी स्त्रिया<br>डॉ.शारदा गोविंदराव बंडे | १६१-१६३ |
| ३४. | 1857 च्या राष्ट्रीय उठावात मुस्लिम महिलांचा सहभाग<br>डॉ.शेख हुसेन इमाम | १६४-१६७ |
| ३५. | भारताच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण: आशा कार्यकर्त्यांची भूमिका आणि वित्तीय आव्हाने<br>धनश्री वैजनाथ जायभाये, डॉ. रामनाथ सांगुळे | १६८-१७१ |
| ३६. | स्त्रिमताधिकाराची चळवळ आणि रमाबाई रानडे<br>पवन तुकाराम गुरनुले, डॉ. डी. डी. आदे | १७२-१७६ |
| ३७. | महिलांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणासाठी शासनाच्या योजना व संधीचा अभ्यास.<br>प्रतिमा कमलाकर बोरोळकर, प्रा. डॉ. सि.जे. देशमुख. | १७७-१८३ |
| ३८. | "मध्ययुगीन संत सोयराबाई यांच्या अभंगातून प्रतीत होणारा समकालीन सामाजिक जागर"<br>प्रा डॉ जयश्री रमेश कुलकर्णी | १८४-१९३ |
| ३९. | स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचे योगदान<br>प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने | १९४-१९७ |
| ४०. | महिला संत परंपरेत संत बहिणाबाई यांचे स्थान<br>प्रा. डॉ. विजया साखरे | १९८-२०३ |
| ४१. | वारकरी संप्रदायातील स्त्री कीर्तनकारांबाबतची नवी समस्या<br>प्रा. डॉ. श्रीहरि रंगनाथराव पितळे | २०४-२०९ |
| ४२. | समाज सुधारणा चळवळीतील पंडिता रमाबाई यांचे योगदान<br>प्रा. नागोराव मधुकर तारू | २१०-२१२ |
| ४३. | "स्त्री शिक्षणातील समाज सुधारकांचे योगदान"<br>प्रा. सुनील लक्ष्मण परदेशी | २१३-२१७ |
| ४४. | स्त्रीवादी लेखीका ताराबाई शिंदे<br>प्रा.डॉ.एस.एन.तुरुकमाने | २१८-२१९ |
| ४५. | स्त्री यांचा सामाजिक संघर्ष 'स्व' जाणिवा:स्त्री आत्मकथन<br>प्रा. शिंदे भारत विठ्ठलराव | २२०-२२६ |
| ४६. | भारतीय महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा.माने पौर्णिमा राम | २२७-२३२ |
| ४७. | महिलांचे सामाजिक,आर्थिक आणि राजकीय सबलीकरण<br>डॉ.डी.एस.कळंबे, योगेश रामकृष्ण वायाळ | २३३-२३५ |


Scanned with OKEN Scanner

# ३८."मध्ययुगीन संत सोयराबाई यांच्या अभंगातून प्रतीत होणारा समकालीन सामाजिक जागर"

प्रा. डॉ. जयश्री रमेश कुलकर्णी
इतिहास विभागप्रमुख
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव.

**सारांश(Abstract)** :- 'चोख्याची महारी' असं स्वतःला म्हणवून घेणाऱ्या संत सोयराबाई, संत चोखोबांच्या पत्नी या चौदाव्या शतकातील मराठी कवयित्री अभंगकार होत. त्यांच्या उपलब्ध 62 अभंग रचनांमधून त्यांच्या सुधारणावाद आणि वेगळेपणाबरोबरच तात्कालीन समाजातील दलितांची दुस्थिति, दारिद्य, सामाजिक अनुभव, सामाजिक दुष्प्रथा, देवभोळेपणा, अंधश्रद्धा यांचे दर्शन पाहायलां मिळते. तसेच सोयराबाईंचा साधाभोळा भक्तिभाव, सामाजिक तसेच स्त्रीविषयक तात्कालीन दुष्प्रथांविरोधी जागर, भक्तीमार्गाच्या स्वीकारातून अध्यात्मिक व आत्मिक प्रगती साधण्याचा मार्ग इत्यादी विचारांचे दर्शन होते. सोयराबाईंच्या अभंगांमधून प्रतीत होणारं तत्त्वज्ञान साधं, सोपं, स्पष्ट, सामान्यातल्या सामान्याला आकलन होणारं आणि आचरण सुलभ आहे. त्यामुळे तात्कालीन सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जागर करणारं साहित्य म्हणून त्यांच्या साहित्याचे स्थान वेगळे आहे.

प्रस्तावना:- प्राचीन मराठी वाङ्मयाची उदयभूमी व विकासभूमी असणारा महाराष्ट्र सर्वांगीण साहित्यासाठी प्रसिद्ध असला तरी प्रामुख्याने मध्ययुगातील संतसाहित्य हे त्या निर्मितीचा मेरूमणी म्हणावे लागेल. मध्ययुगात अखंड भारतात अर्थात महाराष्ट्रातही राजकीय विकलावस्थेबरोबरच जाती-वर्ण, धर्म-पंथ, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य, स्त्री-पुरुष अशा अनेक सामाजिक भेदाभेदांनी समाज ढवळून निघाला होता. राष्ट्रकुटांच्या कालखंडाआधीपासूनच लोकजीवन संकुचित होऊन सर्वसामान्य जनतेस आर्थिक, शैक्षणिक प्रगतीची कवाडे बंद झाली होती. परिणामी आध्यात्मिक, वैचारिक, तत्त्वज्ञानात्मक, सामाजिक उन्नती ही कुंठीत झाली होती, अशावेळी हतबल, विवश आणि निराश झालेल्या सामान्य माणसाला धैर्य, शांतता, समाधान, आनंद आणि जीवन जगण्याचा सोपा मार्ग संत मंडळींनी प्राप्त करून दिला. तेराव्या शतकापासून ते एकोणिसाव्या शतकापर्यंत विविध भक्ती प्रवाहांच्या माध्यमातून आणि आपल्या रचनांमधून संतांनी समाज स्वास्थ्य टिकवून ठेवले.

बाराव्या शतकातील संत ज्ञानेश्वरांपासून सुरू झालेली भागवत धर्माची भक्ती परंपरा महाराष्ट्रातील अनेक संतांनी पुढे नेऊन महाराष्ट्राचे स्थान सर्वात उंचीवर नेऊन ठेवले. या संतपरंपरेत ज्ञानेश्वर, सोपानदेव, निवृत्तीनाथ, नामदेव, चोखोबा, एकनाथ, गोरोबा, सावता माळी, नरहरी सोनार, तुकोबाराय या अशा पुरुष संतांबरोबरच जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, सोयराबाई अशा अनेक स्त्री संतांचाही समावेश होतो.

उद्देश :- वरील स्त्री संतांपैकी सोयराबाई या संत चोखोबांच्या पत्नी, ज्यांच्या रचना व त्यातील सामाजिक अध्यात्मिक आशय यांचा फारसा अभ्यास झालेला नाही. त्यांच्या उपलब्ध झालेल्या 62 अभंगामधील समकालीन सामाजिक स्थिती त्या संदर्भातील त्यांचे विचार आणि त्यातून सामाजिक जागरणातील त्यांनी निभावलेली भूमिका यावर प्रकाश



Scanned with OKEN Scanner

टाकते. तसेच त्यांचे सामाजिक स्थान, स्थल व काळ यांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचे महत्त्व उलगडणे हा या शोधालेखा मागील उद्देश आहे.

संशोधन पद्धती :- संदर्भ ग्रंथांचा वापर, तुलनात्मक पद्धती, कालक्रमानुसार घटनांचे विश्लेषण, प्रतिवास्तव विश्लेषण पद्धती इत्यादी.

कळीचे शब्द (Key words) :- सोयराबाई, चोखोबा, अभंग, भागवत धर्म, बंका, निर्मला, कर्ममेळा, पांडुरंग, भक्तिमार्ग, वारी, चोख्याची महारी इत्यादी.

विषय मांडणी :- बाराव्या शतकापासून उत्तर भारताप्रमाणेच दक्षिण भारतात महाराष्ट्रातही भक्ती चळवळ प्रभावी होती. या चळवळीतील भागवत धर्माचा पुरस्कार करणाऱ्या सर्व संतांनी पांडुरंग किंवा विठ्ठल या आपल्या उपास्य दैवतास समोर ठेवून भक्तिमार्गाची शिकवण दिली. वारकरी सांप्रदायिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संतांमध्ये सर्व जाती-वर्ण-वर्गाचे स्त्री-पुरुष संत समाविष्ट होते. त्यांनी ग्रंथ, श्लोक, अभंग, भारुडे, फटके, कथा-कीर्तने यांच्या माध्यमातून प्रादेशिक व लोकभाषेतून समाज प्रबोधन केले. यातूनच मराठीला ज्ञान भाषेचा व ग्रंथ भाषेचा दर्जा प्राप्त करून दिला.[1] प्रादेशिक भाषेतून साहित्य निर्मिती करणाऱ्या या संतपरंपरेतील संत हे उच्चशिक्षित किंवा लेखनवारसा असलेले होते असे नाही, तर त्यांतील स्त्री संत अथवा कष्टकरी जाती-वर्गातील संतांनी तर आपल्या दैनंदिन कार्यामध्ये रत होऊन आणि आजूबाजूच्या परिस्थितीची अनुभवाधारित जाण ठेवून मौखिक पद्धतीने साहित्य रचना केल्या. त्या समाजापर्यंत पोहोचवून समाज जागृती करण्याचा, बहुजनांच्या समस्या व दोषांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. अशा संतांपैकी एक म्हणजे चोखोबा. अत्यंत विपरीत परिस्थितीत, काबाडकष्ट आणि उपेक्षा सोसत जीवन व्यतीत करताना त्यांनी आपल्या रचनांमधून सर्व समाज बांधवांमध्ये जागृती केली. त्यांच्या या परंपरेचाच एक भाग त्यांची पत्नी सोयरा ही होती. हे खरे असले तरी तिने आपल्या अभंग रचनांमधून आपला एक वेगळा ठसा निर्माण केला, असे म्हणावे लागेल. खरे तर तिच्याविषयीची फारशी माहिती उपलब्ध होत नाही. तिने शेकडो अभंग रचले असावेत. मात्र त्यातील केवळ ६२ अभंग सध्या उपलब्ध आहेत.[2]

सोयराबाईंचे जीवन चरित्र :- चौदाव्या शतकात मंगळवेढ्याच्या हरिजन वाड्यात जन्मलेल्या चोखामेळ्याची म्हणजे चोखोबांची पत्नी सोयरा. पतीपरायण, पारमार्थिक, सहचारिणी! तत्कालीन शूद्र गणल्या जाणाऱ्या, शिक्षण व इतर सामाजिक-धार्मिक हक्क डावलल्या गेलेल्या समाजातील एक स्त्री आत्मज्ञानाबरोबरच मानवी जीवनाच्या तत्त्वज्ञानाचा शोध घ्यायचा प्रयत्न करते. स्वत्व शोधताना केवळ समाजाशीच नव्हे, तर देवरायाशी म्हणजे तिचे आणि चोखोबाचे आराध्य दैवत विठ्ठलाशी वाद घालते. या सगळ्या संघर्षातून तिला जाणवलेले सत्व, तत्त्व आणि ज्ञान आपल्या अभंगांच्या रूपाने जगासमोर चिरंतन ठेव्याच्या रूपाने मांडते. त्यातूनच तिचे वेगळेपण जाणवते. सोयराबाई आपल्या बहुतेक अभंगाच्या शेवटी 'चोख्याची महारी'[3] असा स्वतःचा उल्लेख करते. यातून तिची पतीनिष्ठा, भक्ती आणि समकालीन स्थितीचा स्वीकार करण्याची मानसिकता दिसून येते. नवऱ्याबरोबर मेलेली गुरेढोरे गावाबाहेर ओढून नेणाऱ्या सोयराबाईच्या अभंगरचना मात्र मनास भिडणाऱ्या, साध्या-सोप्या भाषेतून तिच्या विचार कार्याचे अनेक पैलू उलगडणाऱ्या आहेत.

I) संसारासक्ती व शरीरासक्तीचे फोलपण- आपले पती चोखोबा, नणंद निर्मळा, भाऊ बंका आणि मुलगा कर्ममेळा यांच्यासह विठ्ठल भक्तीची आणि आपल्या रचना व कृतीतून समाजजागृतीची धुरा वाहणारी सोयरा आपले कौटुंबिक कर्तव्य पार पाडते, ते मात्र संसारासक्तीत न अडकता.

"किती हे सुख मानिती संसाराचे।

काय हे साचे मृगजळ।

अभ्रीची छाया काय साच खरी।

तैसीच हे परी संसाराची॥"[4] किंवा

'मी आणि माझे वागविती भार।

पुढील विचार न करता।

का हे गुंतले स्त्रीपुत्रधना।

का ही वासना न सुटे यांची॥[5]

या शब्दात त्या संसारासक्ती आणि देहासक्तीवर कोरडे ओढतात. तसेच

'वाउगे घरदार, वाउगा संसार।

वाउगे शरीर, नाशिवंत।' किंवा

'सुख नाही संसारी।

म्हणे चोख्याची महारी।

माझे म्हणुनी गुंतले हावभरी।

वाया या संसारी मृगजळा॥

या ओळींमधून मानवी देह, त्याप्रती असलेली आसक्ती, संसाराची ओढ ही कशी फोल आहे, त्यातून मुक्त होऊन मुक्ती मार्ग कसा साधावा हे सांगताना त्या म्हणतात, 'कोण या पांगीला होईल संसार। किती शिणताती प्रपंच परमार्थी परी न घडे सर्वथा हित कोणा॥ न घडे प्रपंच न घडे परमार्थ। न घडेचि स्वार्थ दोहीसे विषीं॥' हा संसार मृगजळ आहे. अभ्रीची सावली(ढगांची तात्पुरती सावली) आहे. म्हणजे त्याचे सुख क्षणभंगुर आहे. त्यामुळे त्याचा मोह फुका आहे. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून अडकण्यासाठी कारणीभूत आहे. हे सांगताना त्या म्हणतात,

'अभ्रीची छाया काय साच खरी।



Scanned with OKEN Scanner

तैसेच हे परी संसाराची।

सोयरा म्हणे अंती कोण सोडवील।

फजिती होईल जन्मोजन्मी॥'[6]

2) सदाचारी अथवा दुराचारी वर्तनातील फरक :- सकल समाजाला सदाचाराचा मार्ग अवलंबण्याची विनवणी करणाऱ्या संत सोयराबाई मूढ लोकांना सदाचारी व दुराचारी वर्तनातील फरकही आपल्या अभंगातून सांगतात जसे की,

'वाया आचार विचार। सदा मलीन अंतर। सोंगाचे ते सोंग। दावी रंग कथेचा॥ परधनी सदा मन। वरी दावीतसे डोलून। ऐसा नर तो दुराचारी। म्हणे चोख्याची महारी॥' किंवा

'वायांचि वोझे घेती आपुला ते शिरी।

वावगे हांवभरी होती वाया ॥

संत आणि भक्तसंग, भक्तीचा व्यासंग, न गुंतता कर्तव्यसंग असे जीवन जगण्याचा साधा सरळ मार्ग सांगताना त्या या लोकांच्या डोळ्यावरील दुराचाराचा कैफ बाजूला सारू पाहतात आणि स्वतःलाच प्रश्न विचारतात की,

'देखोनी आंधळे कां बा जन होती।

नकळे या गती मज लागी।'

3) भक्ती-मुक्तीपर विचार :- तेराव्या- चौदाव्या शतकात बहुजनांना जिथे आचार- विचार -विहार -शिक्षण असे स्वातंत्र्य किंवा अधिकार नव्हते. धार्मिक विधी व मंदिर प्रवेश अधिकार नव्हते. तेथे त्यांचा भक्तीचा अधिकार कोणी हिरावून घेऊ शकत नाही, हा आत्मविश्वास आपल्या समाज बांधवांमध्ये सोयराबाईंनी प्रस्थापित केला. ज्याप्रमाणे 'दळिता कांडीता। तुज गाईन अनंता॥'[7] असे म्हणत जनाबाईने, तर 'कांदा मुळा भाजी। अवघी विठाई माझी॥' असे म्हणत संत सावता माळ्याने जगाला हेच सांगितले,की आपले दैनंदिन कार्य करत आपण नामसंकीर्तनाद्वारे, भजन-नामस्मरणाद्वारे ईश्वराची भक्ती करू शकतो. त्यामुळे माणूस ईशभक्तित तल्लीन होऊन संसारी माया-मोहापासून दूर होतो. त्याचा मुक्तीचा मार्ग खुला होतो. त्याचप्रमाणे संत सोयराबाईंनीही ईश्वराला या महासागरातून आम्हास तारुन नेण्याची भक्तीरुपी साद घातली आहे.

'तुम्ही केशवा उदार। करा माझे समाधान।

दाखवा चरण आपुले॥'. किंवा

' नाही उरली वासना। तुम्हा नारायणा

पाहता॥'



Scanned with OKEN Scanner

या शब्दात त्या व्यक्त झाल्या आहेत. म्हणजे सगुण-साकार भक्ति उपासनेचा पुरस्कार त्यांनी केला आहे. शिवाय चंद्रभागेस तीर्थस्थान, अन्नदान आणि देवाला प्रदक्षिणा या मार्गाने पुण्यप्राप्ती, मनशांती मिळते असे त्या आपल्या अभंगात सांगतात. तर

'तुचि उदार त्रिभुवनी। ऋद्धी सिद्धी तुझे चरणी। भुक्तीमुक्तीचा तू दाता।मी ते काय वानूं आता।।'[8]

अशा रचनेतून विठ्ठलभक्तीचे, त्याच्यावरील मुक्तिदाता म्हणून असलेल्या विश्वासाचे आगळे रूप त्यांनी प्रगट केले आहे. तसेच चोखोबाच्या मृत्यूनंतर भेटावयास आलेल्या निर्मळेस आपल्या पतीच्या मृत्यूचे वर्णन 'चोखा मेळविला विठ्ठल रुपी।'[9] या शब्दात करताना विठ्ठलावरील याच विश्वासाचे दृढ रूप उभे केले आहे.

4) विठ्ठलभक्ती आणि दर्शनाच्या अधिकाराचा आग्रह :-

'अवघा रंग एक झाला। रंगी रंगला श्रीरंग। मी तूंपण गेले वाया। पाहतं पंढरीचा राया।। नाही भेदाचे ते कामा।पळोनी गेलेक्रोधकाम। देही असुनी तूं विदेही।सदा समाधीस्थ पाही।।[10]

या भावविभोर शब्दात विठ्ठलाबाबतचा जिव्हाळा, एकतानता व्यक्त करणाऱ्या सोयराबाई आपल्या आणि आपल्या अस्पृश्य बांधवांच्या वाट्याला आलेली मंदिरप्रवेश आणि विठ्ठल दर्शनाबाबतची उपेक्षा यांचा जाबही विठ्ठलाला विचारतात. तर कधी विव्हल होऊन आर्तपणे आळवताना आढळतात कि, '

तुम्ही केश्वा उदारा करा माझे समाधान। दाखवा आपले चरण।' अथवा

' मज अव्हेरिता कोण म्हणेल थोरी। म्हणतसे चोख्याची महारी।।' तसेच

'घेतले पदरी आतां। न टाकावे दुरी।अवघी माझी वासना। पुरवावी नारायणा।।' या ओळींमधून विठ्ठलभेटीची, दर्शनाची आस व्यक्त करतात. विठ्ठल दर्शनाच्या हट्टासाठी अडून बसलेल्या सोयराबाई म्हणतात की '

धरणे घेऊनी दारात। बैसलेसे नाम गात।

दुजा धंदा कांही नेणे। तुमचे कृपेचे पोसणें। द्वारी बैसोनी हाका मारी। म्हणे चोख्याची महारी।।' तर प्रसंगी चोखोबाचा छळ पंढरीच्या ब्राह्मणांनी केला ही तक्रार ही ती त्या विठ्ठलाकडे नोंदवतात.।।

5) कर्मकांडविहीन समर्पित भक्तिमार्गाचा व नामसंकिर्तनाचा पुरस्कार:- चोखामेळा आणि सोयराबाईचा कालखंड म्हणजे अतिरेकी कर्मकांड, पूजा-अर्चा-उपचार आणि त्यासाठी मध्यस्थ पुरोहित वर्गाचे अवडंबर, तसेच बहुजनांना ईश्वर पुजेपासून वंचित ठेवण्याची मानसिकता यांचा पर्वकाळ होता. अशावेळी उपेक्षित दलित वर्गाला समर्पणाच्या साध्यासोप्या भक्तीमार्गाचे महत्त्व दाखवणारे तत्त्वज्ञान सोयराबाई सांगतात. ईश्वराप्रति केवळ आत्मसमर्पण भाव असेल तर ईश्वर भेटतो, असा विचार त्यांच्या जवळ जवळ प्रत्येक अभंगात येतोच.



Scanned with OKEN Scanner

'आणिक देवाचे न करा साधन। वायां होय शीण आदि अंती॥ रोटी-सुठी लागी पिडिताती जगा। हेंचि त्यांचे अंगा देवपण॥' म्हणून कर्मकांडाधिष्ठित देवाच्या व कर्माच्या मागे धावू नका असा उपदेश त्या आपल्या बांधवांना करतात. अशा आशयाच्या अनेक ओळी त्यांच्या विविध रचनांमधून गुंफलेल्या दिसतात.

उदाहरणार्थ:- ' यमाची यातना होईल बा जेव्हा। सोडविल तेव्हा कोण त्यासी। याच लागे म्हणा राम कृष्ण हरी। म्हणे चोख्याची महारी॥ तसेच

'कृपाळूवा माझा बाप। विठ्ठल निर्मळ एकरूप।' किंवा

'नाठवे भावना देहाचा विसर। विठ्ठल उच्चार संतजनी।', तसेच

'नामेचि तरले नर आणि नारी। ताले दुराचारी हरिनामे। पाहा अनुभव आपुले अंतरी। नामेंचि उद्धरी जड जीवा॥'

या भावभक्तीनामी शब्द गुंफणीतून आर्तते बरोबरच भक्ती आणि नामजपचा महिमा त्या वारंवार सांगतात. 'नामाचे चिंतन अखंड जया वाचे। हेंचि साधनाचे सार एका॥' किंवा 'संसार बंधने नामेचि तुटती। भुक्ती आणि मुक्ती नामापासीं॥', 'सुखाचे हे नाम आवडीने गावे। वाचे आळवावे विठोबासी॥'[12] या रचना त्यांच्या विचारांचेच मूर्त रूप आहेत. वारकऱ्यांचे आराध्य दैवत विठ्ठलाच्या नामाचा आणि भक्तीचा महिमा सोयराबाईने शेवटी एका वाक्यात सार्थपणे दर्शविला आहे

'विठ्ठल म्हणता कार्यसिद्धी।'

या उक्ती मधून केवळ विठ्ठलनामाचा महिमा त्यांनी सांगितला नाही, तर तत्कालीन दीनदुबळ्या उपेक्षित समाजात आत्मविश्वास निर्माण करणारा एक परवलीचा शब्द त्यांना बहाल केला आहे.

6) स्पृशास्पृश्यता, विटाळचांडाळ, समाजउपेक्षा विरोधी विद्रोही विचार :- अस्पृश्यांना स्पर्श केला की विटाळ होतो असे म्हणणाऱ्यांना 'खरा विटाळ काम क्रोधांचा आपल्या आत्म्याला होतो' [13] असा रोखठोक जाब देणाऱ्या सोयराबाई, अस्पृश्यतेचे चटके स्वत: सोसलेल्या सोयराबाई या समाजविघातक प्रथेविरोधी बंड करून उठतात. देवाशी उभा दावा मांडतात, वाद घालतात. चोखोबांना पंढरीतील ब्राह्मणांनी छळल्याची तक्रार त्या थेट विठुरायाकडे करतात

'पंढरीचे ब्राह्मणे चोख्यासी छळीले।

जयालागी केले नवल देवे॥'[14]

त्या देवाला प्रश्न करतात, की देवा हा देह जर तूच निर्माण केलास तर त्याला विटाळ कसा? आत्मा जर ईश्वराचे रूप असेल तर त्याने धारण केलेले शरीर कदाचित मलिन असेल पण अशुद्ध कसे? मग ही विटाळ-चांडाळाची उपेक्षा आम्हा पामरांच्या माथी का? असा प्रश्न उपस्थित करताना त्या म्हणतात,

' देहीचा विटाळ देहीचं जन्मला।



Scanned with OKEN Scanner

सोवळा तो झाला कवणधर्म।

विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान।

कोण देह निर्माण नाही जगी॥'किंवा

'देहाशी विटाळ म्हणती सकळ।

आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ॥'

अस्पृश्यांबाबत असो किंवा स्त्रीबाबत असो विटाळ ही भावना कशी अयोग्य आहे हे परखडपणे त्या मांडतात. तर आपल्या समाज बांधवांच्या नशिबी आलेल्या दुरावस्थेबाबत कळवळलेल्या सोयराबाई परमेश्वराला प्रश्न करतात, त्याचा निषेध व्यक्त करतात...

'आमुची केली हीन याती।

तुझं का नकळे श्रीपती।

जन्म गेला उष्टे खाता।

लाज न ये तुमच्या चित्ता॥'[15]

तर पुढे जाऊन त्या म्हणतात की,

'हीन हीन म्हणोनी का गं मोकलिले।

परि म्या धरिले पदरी तुमच्या॥'

या त्यांच्या शब्दातून देवाकडून असलेल्या त्यांच्या समतेच्या न्यायाच्या अपेक्षा व्यक्त होतातच, पण तत्कालीन दलित समाजाच्या हाल आणि यातनांचे साद्यंत वर्णन व चित्रणही पहावयास मिळते.

'विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली। नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले। वित्तविना शुद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्याने केले।' हे महात्मा ज्योतिबा फुलेंना कळलेले गमक सोयराबाईंनाही कळले होते. पण ही परिस्थिती बदलणे त्यांच्या हातात नव्हते. म्हणून त्या विठ्ठलास म्हणतात,

'आमची तो दशा विपरीत झाली।

कोण आम्हा घाली पोटामध्ये।

आमचे पालन करील बा कोण।

तुजविण जाणं दुजे आतां।



Scanned with OKEN Scanner

कळेल ते करा तुमचे उचित।

माझी तो नित निवेदिली॥'

मग हे विठ्ठला तूच सांग, की तू एवढा संतपदाला ,ईशपदाला पोहोचलेला आहेस तर आमची अशी अवहेलना का केलीस? 'शरण आलिया दावीतासां पाठी। काय थोर गोष्टी वानू देवा॥' हा तिचा एकटीचाच नव्हे तर अखंड उपेक्षित समाजबांधवांचं प्रतिनिधित्व करणारा प्रश्न आहे. त्यांच्या दास्यत्वातून मुक्ततेचा उद्गार करणारा आहे. ज्ञानेश्वरांच्या भाषेत, इया भारापासोनि सोडली, मेदिनी हे।'अर्थात या पृथ्वीचे म्हणजे समाजाचे रक्षण कर.[16]

**निष्कर्ष**:- 13व्या-14व्या शतकात एकीकडे अवघी भरतभूमी इस्लामी अत्याचारी सत्तेशी झुंजत असताना भारतीय हिंदू समाजातील बहुजन दलितांचा स्वत्वाविषयीचा, जातीय अत्याचार विरोधीचा लढा निकराने चाललेला दिसतो. या लढ्यात समकालीन संतांची भूमिका अनन्यसाधारण आहे. तेराव्या शतकात सुरू झालेल्या या संत चळवळीची पताका महाराष्ट्रातील संतांनी आपल्या खांद्यावर घेऊन पुढे नेली. त्या संत परंपरेतील आपला खारीचा वाटा उचलणाऱ्या चोखोबा पत्नी सोयराबाई यांचे कार्य साहित्यिक योगदानाबरोबरच सामाजिक जागरणातही महत्त्वाची भूमिका बजावते. त्यांच्या अभंगरूपी अभिव्यक्तीतून तत्कालीन समाजातील विषमता, जातीय उतरंड आणि त्याचे दुष्परिणाम भोगणारा दीनदलित समाज तसेच स्त्री वर्ग यांचे वास्तव चित्रण आढळते. त्याबरोबरच या दुरावस्थेविरोधी सोयराबाईंचे कधी आर्त- हतबल तर कधी आशावादी, कधी स्वीकृत तर कधी विद्रोही, कधी विरक्त तर कधी भक्ती आसक्ती रूप पाहायला मिळते. भगवंताविषयीच्या अनपेक्षित अनुभवातून आलेला सात्विक संतापाचा, नवलाचा, आगतिकता आणि निराशेचा त्यांचा हुंकार ईश्वरी कृपेच्या आशावादात, भक्तीजीवनाच्या धन्यतेत, आश्वासकतेत परावर्तित झालेला दिसतो. कधीकधी त्यांच्या अभंगांमधून समकालीन दलितांच्या मूलभूत हक्कांचा जागर करणारे विचार प्रकट होताना दिसतात. या पार्श्वभूमीवर विठ्ठल मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी, त्याच्या दर्शनाच्या अधिकारासाठी विटाळचांडाळवादी वृत्तीविरोधी लढताना समाज प्रवाह विरोधी जाण्याची उर्मी, धाडस आणि आपल्या उपेक्षित समाजाप्रतीची तळमळ त्यांच्या ठिकाणी दिसते. आपल्या समाज बांधवांना त्यांच्या यातनांच्या गर्तेतून बाहेर पडण्यासाठी सदाचार, विठ्ठलभक्ती, शुद्ध, साधे व निर्मळ जीवन, समर्पित भाव हा मार्ग दाखविण्याची सजगता जाणवते. मरगळलेल्या उपेक्षित समाजात विठ्ठल भक्तीच्या मार्गाने मानसिक बल, उत्साह व एकतेची भावना रुजवण्याचा आटोकाट प्रयत्न दिसतो. त्यामुळे संत सोयराबाई यांचे जीवन ध्येय केवळ आत्मज्ञान प्राप्त करणे हे नसून सकल मानव जातीच्या कल्याणासाठी अनुभव व तत्त्वज्ञानाचा प्रसार करणे हे होते, असे प्रतीत होते. त्यांचे कार्य समकालीन नव्हे, तर सर्वकालीन सर्वांगीण सामाजिक जागर करणारे ठरते.

तळटीपा :-

1. डॉ.व. तु. देशपांडे-मध्ययुगीन भारत सागर पब्लिकेशन, पुणे -2017, प्रथम आवृत्ती- पृष्ठ क्रमांक 171.



Scanned with OKEN Scanner

2. संपादक: महादेव शास्त्री जोशी-भारतीय संस्कृती कोश खंड 10- भारतीय संस्कृती कोश प्रकाशन मंडळ, पुणे -2009, तृतीय आवृत्ती- पृष्ठ क्रमांक 160.

3. अ.ना.देशपांडे म.रा. जोशी-प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,भाग 2 -व्हीनस प्रकाशन, पुणे -1996, द्वितीय आवृत्ती -पृष्ठ क्रमांक 146.

4. कित्ता

5. कित्ता

6. संपादक:हे. वि. इनामदार, विलास खोले-भक्ती गंगेच्या वाटेवर-संजय प्रकाशन पुणे, 1988-प्रथम आवृत्ती-पृष्ठ क्रमांक 115.

7. कित्ता -पृष्ठ क्रमांक 76.

8. कित्ता -पृष्ठ क्रमांक116.

9. http:/www Santasahitya.in/abhang-gatha/Soyrabai-abhang/

10. संपादक:हे. वि. इनामदार, विलास खोले-भक्ती गंगेच्या वाटेवर-संजय प्रकाशन पुणे, 1988-प्रथम आवृत्ती-पृष्ठ क्रमांक 107.

11. अ. ना. देशपांडे, म. रा. जोशी- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,भाग 2 व्हिनस प्रकाशन, पुणे -1996 -द्वितीय आवृत्ती पृष्ठ क्रमांक 146.

12. श्री देविदास मिसळ- 'संत साहित्य -अभंग गाथा' लेख-पृष्ठ क्रमांक 146.

13. संपादक: रवींद्र गोळे -अभंग सेतू भाग 1- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई- २०१८, प्रथम आवृत्ती- पृष्ठ क्रमांक 79.

14.अ. ना. देशपांडे, म. रा. जोशी- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,भाग 2 व्हिनस प्रकाशन, पुणे -1996 -द्वितीय आवृत्ती पृष्ठ क्रमांक 146.

15. श्री प्रसाद जाधव- संतांचे चरित्र-संत सोयराबाई चोखामेळा (अप्रकाशित लेख)- 2014.

16. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे -महाराष्ट्र संस्कृती -कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-1979- प्रथम आवृत्ती- पृष्ठ क्रमांक 363.

संदर्भ ग्रंथ :-



Scanned with OKEN Scanner

1. नीलिमा शिकारखाने -महाराष्ट्रातील आधुनिक संत-डायमंड पब्लिकेशन, पुणे-2009- प्रथम आवृत्ती.

2. डॉ. सुहासिनी इर्लेकर -संत कवी आणि कवयित्री:एक अनुबंध- स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे 2006-संस्कारीत आवृत्ती.

3. डॉ. व. तु. देशपांडे -मध्ययुगीन भारत-सागर पब्लिकेशन्स, पुणे- 2017, प्रथम आवृत्ती.

4. संपादक: वसंत डहाके, डॉक्टर सदानंद मोरे, काळे, जोशी -संत साहित्य: आकलन आणि अध्यापन -महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे -2018- प्रथम आवृत्ती.

5. प्रा वसंत डहाके -मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती- पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 2008- द्वितीय आवृत्ती.

6. भां. पण. बहिरट, प. ज्ञा. भालेराव - वारकरी संप्रदाय- व्हीनस प्रकाशन, पुणे 1998- द्वितीय आवृत्ती.

7. डॉ शं गो तुळपुळे- मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड 1 - महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे 2005-द्वितीय आवृत्ती.

8. संपादक: प्रा रा. श्री. जोग- मराठी वाङ्मयाचा इतिहास,खंड 3- महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, 1999- द्वितीय आवृत्ती.

9. श्री. म. माटे- संत पंत व तंत - स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे -2006- द्वितीय आवृत्ती.



Scanned with OKEN Scanner